PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Pinjara
Year: 1972

Song: Kashi nashiban thatta
Lyricist: Jagdish Khebudkar

दहा दिशांनी दहा मुखांनी
आज फोडीला टाहो
आसवांत या भिजली गाथा
श्रोते ऐका हो...

माझ्या काळजाची तार आज छेडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
माझ्या काळजाची तार आज छेडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली

गंगेवाणी निर्मळ होतं
असं एक गाव
असं एक गाव
सुखी समाधानी होतं
रंक आणि राव
रंक आणि राव
त्याची गुणगौरवानं कीर्ती वाढली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली

अशा गावी होता एक
भोळा भाग्यवंत
भोळा भाग्यवंत
पुण्यवान म्हणती त्याला
कुणी म्हणे संत
कुणी म्हणे संत

त्याला एका मेनकेची दृष्ट लगली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली

सत्वशील चारित्र्याची घालमेल झाली
घालमेल झाली
गावासाठी नर्तकीला नदीपार केली
नदीपार केली
नार सूड भावनेनं उभी पेटली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली

पिसाळल्या नागिणीनं थयथयाट केला
थयथयाट केला
नाचगाण्यासाठी सारा गाव वेडा झाला
गाव वेडा झाला
त्यांनी लाज भीड निती सारी सोडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली

जाब विचाराया गेला
तिनं केला डाव
तिनं केला डाव
भोवऱ्यात शृंगाराच्या सापडली नाव
सापडली नाव
त्याच्या पतंगाची दोरी तिने तोडली

कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली

खुळ्या जीवा कळला नाही
खोटा तिचा खेळ
खोटा तिचा खेळ
तपोभंग झाला त्याचा पुरा जाई तोल
पुरा जाई तोल
त्याला कुत्र्या मांजराची दशा आणली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कसं बोलू काळीज कसं खोलू
सख्या हो सजणा जी
कसं बोलू काळीज कसं खोलू
सख्या हो सजणा जी
जन्मभरी फसगत झाली
तिचा हा तमाशा
तिचा हा तमाशा
जळुनिया गेली आता जगायची आशा
जगायची आशा
आज हुंदक्यानं भैरवी मी गायिली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कसं बोलू काळीज कसं खोलू
सख्या हो सजणा जी
कसं बोलू काळीज कसं खोलू
सख्या हो सजणा जी

याची देही याची डोळा पाहिले मरण
पाहिले मरण
मीच माझ्या हाती देवा रचिले सरण
रचिले सरण
माझ्या कर्मसोहळ्याची यात्रा चालली
माझ्या कर्मसोहळ्याची यात्रा चालली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली
कशी नशीबानं थट्टा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*